PM-RKVY अंतर्गत कृषि यांत्रिकीकरण उप अभियानासाठी सन २०२६-२७ मध्ये तिन्ही प्रवर्गासाठी (सर्वसाधारण, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती.) एकूण रु.२१८.०३३३३३३ कोटी इतका निधी वितरीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- कृवपदुम-१९०४५/२६/२०२६-MAG-८A (E-१६४९६०३ )**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय (विस्तार), मुंबई-४०००३२.**
**दिनांक : २१ मे, २०२६**

**संदर्भ -:**

१. केंद्र शासनाने www.agricoops.nic.in या संकेत स्थळावरील राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या मार्गदर्शक सुचना.
२. केंद्र शासनाच्या कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, कृषि व शेतकरी कल्याण विभागाचे पत्र क्र.१-१५/२०२६-RKVY-२११, दिनांक २७.०४.२०२६
३. कृषि संचालक (कृषि अभियांत्रिकी सचालनालय), कृषि आयुक्तालय, पुणे यांचे पत्र, जा.क्र.कृ.यां.उ.अ./गुनि-५/नक्र.२६५/३०४-र/२०२६-२७ दि.२७.०४.२०२६
४. वित्त विभाग शासन परिपत्रक, क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०७.०५.२०२६
५. कृषि विभाग, शासन निर्णय, क्रमांक कृवपदुम-१९०४५/२६/२०२६-MAG-८A (E-१६४९६०३) दि.११.०५.२०२६
६. आदिवासी विकास विभाग, शासन परिपत्रक, बियुडी २०२६/प्र.क्र.६१/कार्यासन-६, दि.१३.०५.२०२५
७. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक, बीयुडी-२०२५/प्र.क्र.१०५/अर्थसंकल्प दि.१९.०५.२०२५

**प्रस्तावना :**

राज्यात PM-RKVY अंतर्गत केंद्र पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण उपअभियान केंद्र शासनाच्या कार्यात्मक मार्गदर्शक सुचनांनुसार राबविण्यात येत आहे. केंद्र व राज्य शासनाच्या निधी हिश्श्याचे प्रमाण ६०:४० असे आहे.

प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना (PM-RKVY) अंतर्गत कृषि यांत्रिकीकरण उपअभियान (SMAM) साठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील SLSC च्या दि.१०.०३.२०२६ रोजीच्या बैठकीत मान्यता दिल्याप्रमाणे तसेच केंद्र शासनाच्या प्रकल्प मंजूरी समितीच्या दि.०२.०४.२०२६ रोजीच्या बैठकीत (PAC) दिलेल्या मान्यतेनुसार सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता केंद्र हिस्सा रु.३०० कोटी व त्यासाठीचा अनुरुप राज्य हिस्सा रु.२०० कोटी याप्रमाणे एकूण रु.५०० कोटी निधीच्या वार्षिक कृती आराखडयास संदर्भ क्रमांक ५ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

केंद्र शासनाने संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना (PM-RKVY) अंतर्गत कृषि यांत्रिकीकरण उपअभियान (SMAM) साठी सन २०२६-२७ करिता पहिल्या हप्त्याचा केंद्र हिस्सा रु.१३०.८२ कोटी वितरीत केला असल्याचे कळविले आहे. त्यानुसार पहिल्या हप्त्याचा केंद्र हिश्श्याचा रु.१३०.८२ कोटी व त्यास अनुरुप राज्य हिस्सा रु.८७.२१३३३३३ कोटी असा एकूण

रु.२१८.०३३३३३३ इतका निधी आयुक्त (कृषि) यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्यानुषंगाने शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:**

१. सन २०२६-२७ मध्ये PM-RKVY अंतर्गत कृषि यांत्रिकीकरण उपअभियान (SMAM) करिता तिन्ही प्रवर्गासाठी प्राप्त झालेला केंद्र हिस्सा रु.१३०.८२ कोटी (अक्षरी रूपये एकशे तीस कोटी, ब्याऐंशी लाख फक्त) त्यास अनुरुप राज्य हिस्सा रु.८७.२१३३३३३ कोटी (अक्षरी रुपये सत्तेऐंशी कोटी, एकेवीस लाख, तेहतीस हजार, तीनशे तेहतीस फक्त) असा एकूण रु.२१८.०३३३३३३ (अक्षरी रुपये दोनशे अठरा कोटी, तीन लाख, तेहतीस हजार, तीनशे तेहतीस फक्त) इतका निधी आयुक्त (कृषि) यांना निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे वितरीत करण्यात येत आहे. याबाबत केंद्र व राज्य हिश्श्याचे प्रवर्गनिहाय (सर्वसाधारण, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती) निधी वितरण पुढीलप्रमाणे आहे :-

**(रु. कोटी मध्ये)**

| प्रवर्ग | केंद्र हिस्सा(६०%) | राज्य हिस्सा (४०%) | एकूण |
|---|---|---|---|
| **सर्वसाधारण** | १०३.०८ | ६८.७२ | **१७१.८०** |
| **अनुसूचित. जाती** | १५.४४ | १०.२९३३३३३ | **२५.७३३३३३३** |
| **अनुसूचित. जमाती** | १२.३० | ८.२०० | **२०.५०** |
| **एकूण** | **१३०.८२** | **८७.२१३३३३३** | **२१८.०३३३३३३** |

२. सदर योजनेंतर्गत मंजूर केलेला उपरोक्त निधी खालील लेखाशिर्षाखाली चालू वर्षी अर्थसंकल्पित केलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

| प्रवर्ग | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा |
|---|---|---|
| **सर्वसाधारण प्रवर्ग** | मागणी क्रमाक:- डी-३<br>२४०१ पीक संवर्धन,<br>(००)११३-कृषि अभियांत्रिकी<br>(००) (०८) कृषि उन्नती योजना कृषि अभियांत्रिकीकरण उपअभियान (कें.पु.यो),<br>(केंद्र हिस्सा ६० टक्के) (२४०१ २५१३)<br>३३ अर्थसहाय्य | मागणी क्रमाक:- डी-३<br>२४०१ पीक संवर्धन,<br>(००)११३-कृषि अभियांत्रिकी<br>(००) (१६) कृषि उन्नती योजना कृषि अभियांत्रिकीकरण उपअभियान (कें.पु.यो),<br>(राज्य हिस्सा ४० टक्के) (२४०१ ८७३६)<br>३३ अर्थसहाय्य |
| **अनुसूचित जाती** | मागणी क्रमाक : एन-३<br>२४०१ पीक संवर्धन,<br>७८९ अनुसूचित जाती उप योजना<br>(०१) (११) कृषि उन्नती योजना कृषि अभियांत्रिकीकरण उपअभियान (कें.पु.यो),<br>(केंद्र हिस्सा ६० टक्के) (२४०१बी १८८)<br>३३ अर्थसहाय्य | मागणी क्रमाक : एन-३<br>२४०१ पीक संवर्धन,<br>७८९ अनुसूचित जाती उप योजना<br>(०१) (१२) कृषि उन्नती योजना कृषि अभियांत्रिकीकरण उपअभियान (कें.पु.यो),<br>(राज्य हिस्सा ४० टक्के) (२४०१बी १९७)<br>३३ अर्थसहाय्य |
| **अनुसूचित जमाती** | मागणी क्रमाक : टी-५<br>२४०१ पीक संवर्धन,<br>७९६ जनजाती उप योजना<br>(०१) जनजाती क्षेत्र उप योजनांतर्गत योजना राज्य योजनांतर्गत योजना,<br>(०१) (११) कृषी उन्त्ती योजना कृषि यांत्रिकीकरण | मागणी क्रमाक : टी-५<br>२४०१ पीक संवर्धन,<br>७९६ जनजाती उप योजना<br>(०१) जनजाती क्षेत्र उप योजनांतर्गत योजना राज्य योजनांतर्गत योजना,<br>(०१) (१०) कृषी उन्त्ती योजना कृषि |

| | | |
|---|---|---|
| | उपअभियान (कें.पु.यो),<br>(केंद्र हिस्सा ६० टक्के) (२४०१ए ४५९),<br>३३ अर्थसहाय्य | यांत्रिकीकरण उपअभियान (कें.पु.यो),<br>(राज्य हिस्सा ४० टक्के) (२४०१ए ४४१),<br>३३ अर्थसहाय्य |

३. या उप-अभियानाकरीता वितरीत केलेला निधी केंद्र शासनाने वार्षिक कृति आराखड्यात मंजूर केलेल्या बाबींवर खर्ची टाकावा तसेच, अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांना महा-डीबीटी प्रणालीद्वारे आधारसंलग्न बँक खात्यावर सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीव्दारे जमा करावी.

४. इतर यंत्र/अवजारांच्या बाबतीत केंद्र शासनाच्या कृषि यांत्रिकीकरण उप अभियानाच्या मार्गदर्शक सूचना, अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

५. सदर निधी खर्च करतान तो विहित कार्यपध्दती अनुसरून सर्व वित्तीय कायदे/प्रक्रियाचे/वित्तीय अधिकारांच्या मर्यादा/C.V.C. तत्वानुसार/ प्रचलित शासन निर्णय/ नियम/ परिपत्रक/तरतुदीनुसार, बजेट व कोषागार नियमावलीनुसार खर्च करण्याची कार्यवाही अंमलबजावणी यंत्रणांनी करावी. कोणत्याही परिस्थितीत कुठलाही शासन नियम/ अधिकाराचा भंग होणार नाही, याबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रिय कर्यालयाची राहील.

६. कृषि यांत्रिकीकरण उप अभियानाच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी संचालक, कृषि अभियांत्रिकी संचालनालय, कृषि आयुक्तालय, पुणे यांनी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन उदिष्टनिहाय अंमलबजावणी विषयक सविस्तर सूचना सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना निर्गमित कराव्यात. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे या योजनेचा आर्थिक व भौतिक प्रगतीचा मासिक अहवाल प्रत्येक महिन्याच्या ५ तारखे पर्यंत केंद्र शासनास सादर करावा.

७. सदर अभियानाकरिता वितरित केलेला निधी कोषागारातून आहरित करण्याकरिता आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून आणि सहाय्यक संचालक (लेखा-१) कृषी आयुक्तालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय संदर्भ क्र.४ येथील वित्त विभागाचे शासन परिपत्रक, संदर्भ क्र.६ येथील आदिवासी विकास विभागाचे शासन परिपत्रक व संदर्भ क्र.७ येथील सामाजिक न्याय विभागाचे शासन परिपत्रक या परिपत्रकांन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन व सदर परिपत्रकातील अटी शर्तीची पूर्तता करुन निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०५२११९१४१६८९०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

BHUPESH ARUN KOLI

Digitally signed by BHUPESH ARUN KOLI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=c4831497ab54666fcf0fc384ac56a4a6e7eef3940ffe7ecbeff3b790dc48d7c0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=44C8C2D62EADD87E9FFCCD81C023E722799B7A87A062FC30B0E6A3B49CBA4384, cn=BHUPESH ARUN KOLI
Date: 2026.05.21 19:15:27 +05'30'

**(भुपेश अ. कोळी)**
**कार्यासन अधिकारी ,महाराष्ट्र शासन**

प्रति-:

१. मा. मंत्री (कृषि), मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा. राज्यमंत्री (कृषि), मंत्रालय, मुंबई-३२.

३. अ.मु.स.(वित्त), वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
४. अ.मु.स.(नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
५. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
६. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. सर्व संचालक/सह संचालक, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
८. विभागीय कृषि सह संचालक (सर्व).
९. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व).
१०. महालेखापाल, महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर (लेखा परिक्षा) /(लेखा व अनुज्ञेयता).
११. माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२.
१२. सह सचिव/उप सचिव/ अवर सचिव/कार्यासन अधिकारी (सर्व) (कृषि) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
१३. वित्त विभाग (का. व्यय-१/अर्थसंकल्प-१३), मंत्रालय,मुंबई.
१४. नियोजन विभाग (कार्या-१४३१), मंत्रालय,मुंबई.
१५. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (का- अर्थ वि.घ.यो.), मंत्रालय, मुंबई.
१६. आदिवासी विकास विभाग (कार्यासन-६), मंत्रालय,मुंबई.
१७. निवडनस्ती, ८-अे.